साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष अकरावे, अंक- २रा व ३रा, जुलै-डिसेंबर २०२० (जोडअंक)

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

- संपादक -

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,
मोबा. ९४०४०००३९८

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| * | लोककला विशेषांकाच्या निमित्ताने... - डॉ. शिवाजी हुसे | |
| * | संपादकीय - प्रा. डॉ. चंद्रशेखर कणसे (अतिथी संपादक) | |
| १. | 'कीर्तन' समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम: एक अभ्यास - डॉ. चंद्रशेखर कणसे (परळी वैजनाथ, बीड) | ९ |
| २. | महाराष्ट्रातील लोककला : कीर्तन - प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस (दापोडी, पुणे) | १८ |
| ३. | वारकरी दिंडी लोककला : एक आनंदयात्रा - धन्यकुमार प्रल्हाद तारळकर (ता. फलटण जि. सातारा) | २४ |
| ४. | 'सोंगी भारूडी भजन' - डॉ. आनंद बल्लाळ (आजरा, कोल्हापूर) | ३२ |
| ५. | प्रयोगात्मक लोककलाप्रकार - 'भारूड' - डॉ. नाना झगडे (पुरंदर) | ३९ |
| ६. | विदर्भातील झाडीपट्टी येथील लोककला 'दंडार' - प्रा. अमृता डोरलीकर (नागपूर) | ४७ |
| ७. | महाराष्ट्रातील लोककला 'बोहडा' - डॉ. भास्कर शेळके (अकोले) | ५२ |
| ८. | गोमंतकीय लोककला : विशेष संदर्भ 'धालोत्सव' - डॉ. नीता तोरणे (पेडणे, गोवा) | ५५ |
| ९. | 'गोंधळ : स्वरूप आणि आविष्कार' - डॉ. पांडुरंग भोसले (हडपसर, पुणे) | ६७ |
| १०. | महाराष्ट्रातील लोककला : 'गोंधळ' - डॉ. पद्माकर तामगाडगे (मुंबई) व प्रा. राजू शनवार (ठाणे) | ७१ |
| ११. | महाराष्ट्राचे विधिनाट्य 'गोंधळ' आणि 'जांभूळ आख्यान' - प्रा. शिल्पा नेवे (मुंबई) | ७५ |
| १२. | 'गोंधळ' कला प्रकाराचे बदलते स्वरूप - डॉ. जयदेवी पवार (बाभळगाव, ता. जि. लातूर) | ८९ |
| १३. | गोंधळ : महाराष्ट्राची लोककला - डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग (अहमदनगर) | ९५ |

१४. 'जागरण' - डॉ. राखी सलगर (औरंगाबाद) १०२

१५. गोवा येथील लोककला 'जागर' - प्रा. विनय मडगांवकर (गोवा) १०६

१६. महाराष्ट्रातील लोककला : 'दशावतार व नमन' - प्रा. प्रियंका कुंभार (तासगाव, जि. सांगली) ११४

१७. महाराष्ट्रातील लोकनाट्याचा आविष्कार - 'ललीत' - प्रा. पुरुषोत्तम महाजन (भुसावळ) १२१

१८. 'ललीत' - डॉ. प्रतिभा सोनी (शिक्रापूर, शिरूर) १२८

१९. सर्वांना एकत्र बांधून ठेवणारा सांस्कृतिक ठेवा - 'भोंडला' - प्रा. तारळेकर (सांगली) १३३

२०. 'लोककला तमाशा'- एक अभ्यास - प्रा. डॉ. रामहारी मायकर (वडवणी जि. बीड) १३८

२१. 'लोकरंगभूमीवरील डाका विधीनाट्य' - डॉ. सुनिल टाक (औरंगाबाद) १४३

२२. 'लोकसाहित्यातील लोककला प्रकार' - डॉ. भाऊसाहेब गव्हाणे (केडगाव, ता. दौंड, जि. पुणे) १४८

२३. लोककला : स्वरूप व वाटचाल - प्रा. डॉ. विजय विष्णूपंत केसकर (कळंब, जि. उस्मानाबाद) १५५

२४. 'महाराष्ट्रातील लोककला : एक चिंतन' - कु. वर्षा तांदळे (कोल्हापूर) व प्रा. बाळासाहेब चव्हाण (कोरेगाव) १६०

२५. आदिवाशी यांच्या लोककला - प्रा. चिंतामण धिंदळे (नगर) १६५

२६. महाराष्ट्रामधील आदिवाशी लोककलांचे विवेचन - डॉ. सुनिल घनकुटे (अकोले जि. नगर) १७१

२७. महाराष्ट्र लोकसंस्कृती उपासकांचे कलाविष्कार : वासुदेव आणि पोतराज - डॉ. किरण नामदेव पिंगळे (नाशिक) १७८

२८. लोकसंस्कृतीचे लोककलेतून सहज सुंदर आविष्कार घडविणारा 'वासुदेव' - डॉ. नानासाहेब पवार (हडपसर, पुणे) १८४

२९. पोतराजाची आराधना : एक लोककला - डॉ. नितीन मोटे (वडगाव, पुणे) १९४

३०. महाराष्ट्राच्या लोककलेचा सहजसुंदर आविष्कार - लावणी - डॉ. धबडगे (औरंगाबाद) २००

# शिवोली-गोवा येथील लोकनाट्य 'जागर'

- प्रा. विनय मडगांवकर
मराठी विभाग,
गोवा विद्यापीठ.

**प्रास्ताविक**

गोमंतक ही कला व संस्कृतीने समृद्ध असलेली लोकभूमी आहे. निसर्गाच्या सान्निध्यात जीवन जगणाऱ्या येथील लोकसमूहांनी वृक्ष, वनस्पती, प्राणी, नाग, सांतेर (वारूळ), पाऊस, अग्नी, समुद्र यांना देवत्व बहाल केले. या लोकदैवतांच्या आराधनेसाठी तसेच लोकरंजनासाठी गोमंतकीयांनी नाट्यकलेचा अधार घेतला. गोमंतकीय इतिहासाचे अंश स्वीकारत लोकनाट्य कलेने गोमंतकाची लोकसंस्कृती समृद्ध केली. शिवोली गोवा येथील 'जागर' या लोकनाट्यावर ऐतिहासिक स्थित्यंतराचा प्रभाव जाणवतो. पोर्तुगीजपूर्व काळात गोमंतकात आपल्या श्रध्येय देवतेसाठी 'जागरण' करणे ही लोकपरंपरा अखंडित होती. पोर्तुगीजांची सत्ता प्रस्तापित झाल्यावर त्यांनी येथील 'लोकांचे' धर्मपरिवर्तन केले. शिवोली गावात धर्मांतरित झालेल्या बांधवानी आपली नाट्यकलेतून परमेश्वराची आराधना करण्याची पद्धती प्रतिबंधित होऊ दिली नाही. तत्कालीन राजकर्त्यांमुळे या कलेत बदल घडवून ही लोकाकला अखंडित ठेवली. प्रस्तुत शोधनिबंधात या कलेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थित्यंतरे, विधीनिषेध, गोमंतकातील विविध गावातील या नाट्यकलेचे स्वरूप व विशेष, लोकपरंपरा यांचा चिकित्सात्मक अभ्यास केला आहे.

**गोमंतक : इतिहास आणि लोकसंस्कृती**

'अल्लाउद्दीन खिलजीचा मलीक कफूर, महंमद तुघलक, युसुफ अदिलशहा, पोर्तुगीज असे परकीय संस्कृतीचे आक्रमक येथे आले आणि राज्य करून गेले.'[१] 'येथील प्रथा, परंपरा व संस्कृती नष्ट करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची इतिहासात नोंद आहे.'[२] तरीही गोव्यातील प्रत्येक गावांनी स्वताःचे अस्थित्व जपून ठेवले आहे. असंख्य सांस्कृतिक स्थित्यंतरे, संक्रमणे व संघर्षांना सामोरे जाऊन आपले वेगळेपण सिद्ध करणारा गोव्यातील गाव म्हणजे शिवोली. या गावात भाद्रपद चतुर्थीला काही घरांत श्रीगणेशमूर्ती ऐवजी शंकर-पार्वतीचे पूजन होते. एरवी श्रावण महिन्यात मांसाहार व मत्स्याहार वर्ज होणार म्हणून आषाढ महिन्यात काही लोक भरपूर प्रमाणात मस्य-मांस भक्षण करतात. याला शिवोली गाव अपवाद आहे. येथे आषाढ महिन्यात गुडे या ठिकाणी ग्रामस्थ बुधवार व रविवार या दिवशी शाकाहारी राहून श्रीकाळोबा देवाला मोदक व तत्सम पदार्थ नैवेद्य म्हणून अपर्ण

करतात. पूजनीय सद्गुरू जीवनमुक्त महाराजांनी इ. स. १९५४ मध्ये ही प्रथा सुरू केली होती.[३] जगाबरोबर गोव्यात ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री ख्रिस्ती नववर्षाचे स्वागत होते. शिवोली गोवा येथे गुढी पाडव्याला वर्ष प्रतिपदेस नववर्षारंभ 'होमकांड' (मोठे होमकुंड) उत्सवाने होतो. 'गोव्यातील उत्सवांवर बंदी घालणाऱ्या पोर्तुगीजांना आव्हान देऊन जीवनमुक्त महाराजांनीच या तेजस्वी परंपरेचा इ. स. १९५२ साली शुभारंभ केला होता.'[४] गोव्यावर राज्य करणाऱ्या पोर्तुगीजांविरुद्ध झूंज देणाऱ्या क्रांतिवीरांचे शिवोलीत केंद्र होते.[५] पोर्तुगीजांनी या गावातील काही बांधवांचे धर्मपरिवर्तन केले असले तरी त्यांनी आपल्या वंशपारंपरिक बंधुत्वाचे पालन करणे अबाधीत ठेवले. शिवोलीत साजरा होणारा हिंदू-ख्रिश्चनांचा 'जागर' हा आता विश्वविख्यात झालेला लोकोत्सव आहे.

**जागरः लोकनाट्य**

''जागर' म्हणजे अरिष्ट निवारणार्थ भाविकांनी धार्मिकविधींच्या माध्यमाने आपल्या आराध्य देवतेला सुप्रसन्न करण्यासाठी रात्रभर केलेले जागरण होय.' भारतात तसेच गोव्यात महाशिवरात्री, श्रीदेवीनवरात्री या उत्सवांच्या निमित्ताने, तर आषाढी व कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून होणाऱ्या नामसप्ताहात ग्रामस्थानी दिवस-रात्र जागे राहून देवाची उपासना करण्याची प्रथा आहे. भारतीय संस्कृतीकोषाच्या तिसऱ्या खंडात जागराचा लोकनाट्य म्हणून उल्लेख आहे.[६] लोकोत्सव म्हणून होणार 'जागर' यात रात्रभर जागरण करून संकटनिवारणार्थ आराध्य देवतेची प्रार्थना, धार्मिकविधी, लोकनाट्य, नृत्य व संगीत या कलांचाही समावेश असतो. पुरुषोत्तम कालभूत यांच्या मतानुसार ''कोणतेही 'लोकनाट्य' लिखित स्वरूपात आढळत नाही. त्याचा कर्ता कोण हे देखील खात्रीपूर्वक सांगता येत नाही. लोकनाट्याचे प्रयोग, प्रसार व त्याचे रक्षण मौखिक परंपरेनेच होते, कारण लोकनाट्याची भाषा स्वाभाविक आणि उस्फूर्त असते. चटकदार बोली भाषेचा वापर यामुळे सहजच मौखिक परंपरेने लोकनाट्याचे जतन होते.''[७]

ॲड. पांडुरंग नागवेकर यांच्या मतानुसार ''जागर हा प्रचीन उत्सव असून तो इथल्या गावाडा जमातीचा आवडता लोकनृत्य-नाट्य प्रकार आहे. या समाजात एक परंपरा किंवा रूढी म्हणून वर्षातून एक वेळ तरी जागर सादर केला जातो. अपेव्हाळचा जागर, ख्रिस्ती जागर, प्रियोळचा जागर, वेलिंगचा जागर, चिंबलचा जागर, करमळीचा जागर, शिरदोनचा जागर, वगैरे जागर गोमंतकात फार प्रसिद्ध आहेत. त्यात पेरणी जागर हा एक प्रकार आहे.''[८]

**शिवोलीतील जागर झाला 'जागरयो-जागरेश्वर'**

शिवोली गावातील जागराची परंपरा तीनशे वर्षांची सांगितली जाते. लोकसाहित्याचे संशोधक विनायक खेडेकर यांच्या मतानुसार ''बारदेश तालुक्यात पूर्वी १२

जागर होत होते. अन्य जागरांप्रमाणे शिवोलीचा जागर ही बंद पडला होता. परंतु गावावर अरिष्ट येऊ लागल्याने १८९५ साली परत सुरू करण्यात आला होता.''[१] श्रद्धायुक्त अंतःकरणाने भक्ती करणाऱ्या भक्ताला संकटांना सामोरे जाण्यासाठी परमेश्वर धैर्य आणि शक्ती देतो. मानवनिर्मित जाती-पंथांच्या भिंती परमेश्वरी कृपेच्या आड येत नाही. शिवोलीतील जागराचे स्थान हे असेच हिंदू व ख्रिस्ती बांधवांच्या लोकश्रद्धेचे केंद्र बनले आहे. 'जागर' केवळ कला तथा उत्सव राहीला नाही, तर लोकांनी त्याला भक्तीभवाने देवत्व बहाल केले आहे. हिंदू तसेच ख्रिस्ती भक्तांवर कृपा करणारा, नवसाला पावणारा, चोरांना दंडीत करणारा, संकट निवारण करणारा जागृत देव 'जागरयो' तथा 'जागरेश्वर' म्हणून सर्वत्र प्रसिद्ध झाला आहे.

**जागर लोकोत्सवाचे वैशिष्ट्य**

शिवोली येथे 'जागरयो' देवाच्या मांडासमोर सध्या भव्य मंदिर आहे. जागराच्या मांडावर छोटी घुमटी आहे. त्यात कोणत्याच देवतेची मुर्ती नाही. तेथे ब्राह्मण पुरोहित अथवा पाद्री नसतो. जागर उत्सवाला तिथी-तारीख लागत नाही. ख्रिस्ती बांधवांच्या २५ डिसेंबरला नाताळ या सणानंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी शिवोलीतील चर्चचे फेस्त होते व दुसऱ्या दिवशी सोमवारी जागरोत्सव साजरा होतो. जर ग्रामदेवी सातेरीदेवीचा तिथीनुसार होणारा जत्रोत्सव त्याच दिवशी सोमवारी आला तर 'जागरोत्सव' दुसऱ्या दिवशी मंगळवारी साजरा होतो. असा असा धर्मिक सलोखा व समन्वय या जारोत्सवाच्या निमित्ताने शिवोली गावात पहायला मिळतो.

गोव्यातील इतर काही ठिकाणी होणाऱ्या 'जागर' उत्सवालाही तिथी-तारीख लागत नाही. फोंडा तालुक्यातील अंत्रुज महालात कुर्टी पिजगाळ प्रियोळ येथे मे महिन्याच्या पहिल्या शनिवारी 'जागर' होता, तर ओल्ड गोवा येथे एप्रिल महिन्याच्या शेवटच्या शनिवारी 'जागर' होतो. येथेही जागरासाठी पुरोहीत-पाद्री यांची गरज पडत नाही. स्थलाधिपती देवाला प्रसन्न करणे, अरिष्ट निवारण आणि भूतांपासून संरक्षण व्हावे यासाठी रात्री ९.३० ते पहाटे ६.३० पर्यंत जागराचे सादरीकरण केले जाते. गोव्यात ही परंपरा कोणी सुरू केली व त्यात सादर होणाऱ्या गीत-संवादांची रचना कोणी केली हे प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहेत.

**कृतज्ञतापूर्वक प्रार्थना**

शिवोलीत सुमारे एक महिन्याआधी 'जागर' उत्सवाची तयारी सुरूवात होते. जवळच 'खाजनयो' तथा श्रीखाजनेश्वर श्रीआदिनारायण देवस्थान आहे. खाजन म्हणजे शेती. त्याचे रक्षण करणारा तो देव खाजनयो. त्याला कृतज्ञ भावनेने अभिवादन करण्याच्या उद्देशाने ग्रामस्थ मध्यरात्री 'परब' (उपहार अर्पण करण्याचा लोकविधी) घालण्यासाठी एकत्र येतात. असाच काहीसा प्रकार धुळापे-खोर्ली येथील श्री सातेरी रवळनाथ देवस्थानात जागर

सादर होतो, तेथे पहायला मिळतो. यात दोन ख्रिस्ती बांधवांकडून खुरीसाचे लादीन म्हणजे गावतील परंपरे नुसार तेथील क्रॉससमोर कृतज्ञतापूर्वक प्रार्थना करण्याची प्रथा आहे. तसेच तिसवाडी तालुक्यातील पाळे गांवात जागराच्या आधल्या दिवशी खुर्साचे लादिन केले जाते.

**श्री खाजनयाच्या अदिस्थनाजवळ 'फोवांची परब'**

दांडा शिवोली येथील श्री खाजनयाच्या अदिस्थनाजवळ 'फोवांची परब' श्रीदेव खाजनयाला 'पोहे' अर्पण करण्याचा उत्सव होतो. तेथे श्री खाजनयाचा अवसार (संचार) येतो. त्यावेळी ग्रामस्थ त्याच्याकडून जागराची तालीम करण्याची अनुमती घेतात. ग्रामदेवी श्रीसातेरी देवीला श्रीफळ अर्पण करून जागराची तालीम दांडा शिवोली येथील ख्रिस्ती बांधवाच्या घरासामोर लामणदीवा पेटवून सुरू केली जाते. रविवार, बुधवार व शुक्रवार असे तीन दिवस ही तालीम होते. जागर लोकनाट्यात सहभागी होणारे हिंदू-ख्रिस्ती कलाकार बांधव आवर्जून या तालीमेला उपस्थित राहतात. खेडें-प्रियोळ येथे 'नवहिंदू' गावडा समाजांचा आकार हा गाव आणि खेडे या दोन्ही गावातील ग्रामस्थ असाच एकत्रपणे जागरोत्सव साजरा कारतात. पोर्तुगीज कालखंडातही गोमंतकातील विविध जागरोत्सव सुरूच होते. त्यासाठी ग्रामस्थांना रितसर परवानगी घ्यावी लागत होती.

**जागराची सुवारी (मिरवणूक)**

शिवोलीत जागराच्या उत्सवाच्या दिवशी सकाळपासून भाविक श्री जागरेश्वराचे दर्शन घेतात. रात्री दहानंतर दोन सुवारी म्हणजे मिरवणुकांनी उत्सवाला आरंभ होतो. काहींच्या हातात पेटत्या मशाली असतात. गळ्यात फुलांचे हार असतात. तसेच ढोल, ताशे, घुमट, म्हादाळे व कासाळे वाजवत जगरयाचा जयघोष करत दोन भिन्न मार्गाने या सुवारी मोठ्या उत्साहात जागराच्या मांडाजवळ एकत्र येतात.

**जागरातील नमन**

शिवोलीतील जागरात नाट्यकला सादरीकरणाच्या आरंभी 'आदी नमन देवा बाप्पा सर्वेशा । फुला-पुष्पाच्यारे परिमळा' असे नमन होते. 'माझे पयले नमन देवा बाप्पा । दुसरे नमन देवसुता । तिसरे नमन इस्पीरी सांता । सर्वही देव एकच रे ।' असे म्हणून येशू, माता मेरी यांना आरंभी वंदन केले जाते. खेडें-प्रियोळ येथे ग्रामस्थ जागरोत्सव साजरा कारतात. त्याचा आरंभ ''आधी नमन धरतरी माते'' या नमनाने होतो. गुरगुरे तांबडेमळ प्रियोळ श्रीकृष्ण मंडळ ''पयले नमन करू रे पाताळी शेषा, नमन करू रे सूर्यनारायणा, नमन करू रे धरतरीमाते, नमन करू रे तुळशी माते'' असे नमन केले जाते. निसर्गातील अदृश्यशक्तीच्या पूजनाच्या निमित्ताने मागीलवाडा प्रियोळ येथील श्रीकृष्ण देवस्थानात बरगाळकर देवाला वंदन करून हा जागर साजरा होतो. तिसवाडी तालुक्यातील कुडका या गावात श्री नागेश महारूद्र महामंडळ 'आदी नमन माझे गणेश देवा ।।' या नमनाने

जागराला आरंभ करतात. याच गावात श्री नागेश महारूद्र संस्थान या नावाने आणखी एक जागर सादर होतो. तेथेही असेच नमन होते. तिसवाडी तालुक्यात पाळे गांवात जागर सादर होतो. तेथे 'नमन करू गणपती देवा' म्हणून श्री गणेशाला नमन करून तद्नंतर 'नेणट्या नेणार राणी गा एक एवजीला' या लोकगीतातून येशूच्या जिविताची कथा कथन केली जाते. नमशीवाडा व नारायणवाडो कुंकळी तरुण हौशी नाट्यमंडळ आराध्य देवतेच्या नमनाचे जागराला आरंभ करतात. सकयलेभाट करमळी गोवा येथे श्री कमालावती रवळनाथ सांस्कृतिक मडंळाच्या माध्यमाने जागर साजरा होतो. तेथे 'आदी नामन देवा बाप्पा सांतेवंता' या नमनान जागराला आरंभ होतो. तद्नंतर 'नमन माझे गणेश देवा' या नमनाने गणेश वंदना सादर होते. 'आंब्या तुजे पान रे आंबट, गणेश देवा तुका दंडवत', 'सूर्य उदेला प्रकाश पडला' या गजराने पहाटे सांगता होते. दोन 'संवंग'(पात्र) परंपरेप्रमाणे जल्मी नाचवतो तर इतर सवंगा म्हणजे पात्र 'नवहिंदू' गावडे सादर करतात.[१०]

**जागर सादर करणारे 'नवहिंदू'**

जागरात नाट्यकला सादर करणारे 'नवहिंदू' कोण हे समजून घेणे येथे आवश्यक आहे. पोर्तुगीजांनी गोव्यात सत्ता संपादन केल्यानंतर येथे आलेल्या जेजूईट मिशनऱ्यांनी येथील लोकांचे धर्मपरिर्वतन केले. 'धर्मांतर झालेल्यांनी पूर्वीच्या हिंदूधर्मानुसार वागायचा प्रयत्न केल्यास त्यांना दंडित करण्यासाठी 'इन्क्विझीशन' कोर्ट गोव्यात आणले गेले.'[११] असे असूनही त्यांनी आपली संस्कृती सोडली नाही. यासंदर्भात भारतकार हेगडे देसाई यांचा, त्यांच्याच 'भारत' या नियतकालीकातील लेख लक्षवेधक आहे. ते लिहितात... ''करंबळी, चिंबल, धुळापी व गोमंतकातील इतर ठिकाणी अनेक खिस्ती गावडे आहेत. पण त्यांचा खिस्तीपणा नुसता नावाचा आहे. त्यांना पुनरेव हिंदू धर्मात कां घेऊ नये? श्री सद्गुरू विनायक महाराज मसुरकर यांच्या तेजस्वी धडाडीने व असामान्य धैर्याने अखेर ता. २६ फेब्रुवारी सन १९२६, फल्गुन शुद्ध ६ शके १८४८ रोजी सकाळी चिंबल येथे हजारो लोकांच्या सान्निध्यात गोमंतकात शुद्धीची मुहूर्तमेढ रोवली.'' गुरूवार दिनांक ३ मे १९२८ च्या अग्रलेखात भारतकारलिहितात, पोर्तुगीज सरकारच्या विरोधाची अडगळ लाथाडून शुद्धी चळवळ यशस्वी व जोमदार करण्याची प्रवृत्ती येथील हिंदूत वाढत चालाली आहे. हे येथे नमुद करण्यास आम्हास अभिमान वाटतो.'[१२] 'या ऐतिहासिक घटनेचे पडसाद इंग्लंडच्या पार्लमेंटात उमटले होते.'[१३] कारण गोमंतकातील या शुद्धीकरण कार्यामुळे असंख्य धर्मांतरित गावडे बांधव पुन्हा हिंदू धर्मात आले होते. तेच हे, जागरात नाट्यकला सादर करणारे 'नवहिंदू' होय.

**गोवामुक्ती संग्राम आणि शिवोलीतील जागर**

गोवामुक्ती संग्राम सुरू असतांना शिवोलीतीत पूजनीय जीवनमुक्त महाराजांना गुडे

शिवोली येथे पोर्तुगीजांविरुद्ध होमकुंड उत्सवाला आरंभ करून धर्मक्रांतीचा यज्ञ चेतवला.[१४] त्यावेळी सुखा शिरोडकर यांनी महाराजांना सहकार्य केले होते. 'याच सुखा शिरोडकरांनी क्रांतिवीर मोहन रानडे यांच्या मदतीने राजधानी पणजीच्या पैलतीरी असलेल्या बेती येथील पोलीसस्थानकावर हल्ला चढवून पोर्तुगीजांवर गोळ्या झाडल्या. रानडेंना दोन गोळ्या लागून ते गंभीर जखमी झाले. तेव्हा सुखा शिरोडकराने त्यांना उचलून सुरक्षित स्थानी आणले.'[१५] पोर्तुगीजांनी सुखा शिरोडकरांना पकडण्याचे अथवा दिसताक्षणी गोळ्या घालण्याचेआदेश दिले गेले. शिवोलीत वार्षिक परंपरेनुसार जागर साजरा होणार होता. त्यातीलस्त्रीपात्रांचा कालाभिनय आजूनही पुरुषच सादर करतात. जागरात दोन फुलकार माळीणी मांडावर नाचतात. त्यापैकी एक माळीण पात्र सुखा शिरोडकर सादर करत होते. ते जागराला येणार, याची खात्री पोर्तुगीजांना होती. त्यांनी जागराच्या मांडाभोवती सशस्त्र पोलीसांचे पहारे बसवले. त्यांच्या डोळ्यादेखत वाघाच्या काळजाच्या या सुखा शिरोडकरांनी माळीण स्त्रीवेषात गर्दीत प्रवेश मिळवला. जागराच्या मांडावर माळीणीचे सोंग (कला) सादर केले आणि पसार झाले.

**शिवोलीच्या जागरातील पात्रे**

शिवोलीत शिरोडकर घराण्यातील विठ्ठल शिरोडकरांनी ५५ वर्षे जागराच्या ओव्या म्हणण्याचे सेवाकार्य केले. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव कन्हैया शिरोडकर ही परंपरा सन्मानाने पुढे नेत आहेत. ३१ डिसेंबर २०१९ रोजी शिवोलीच्या जागर लोकनाट्यातील लोककला सदर करणारी पात्रे पुढीलप्रमाणे होती. सईद-अजित शिरोडकर, तिसवाडी तालुक्यात पाळे गांवात जागर सादर होतो. त्यातही 'साईद' हे पात्र आहे. फिरंगी राजा, फुलकार माळी- सुधन शिरोडकर व माळीण सागर शिरोडकर व दीपक शिरोडकर हे सादर करतात. असेच फुलकार माळी सवंग तिसवाडी तालुक्यातील कुडका या गावात श्री नागेश महारूद्र महामंडळच्या जागारातही असते. शेवटी सर्वाचे लक्ष वेधून घेणारा जागरेश्वराच्या मांडावर उत्कृष्ट व अनुपम शुभ्र वेषभुषेत येणारा भरभरयो राजन शिरोडकर मस्तकावर पेटत्या मेणबत्त्यांचा आगळावेगळा मुकुट परिधान करून नृत्याला आरंभ करतो. तेव्हा घुमट, कासाळे व म्हादळे या लोकवाद्यांचा जोर वाढतो. मंत्रमुग्ध होऊन उपस्थित भाविक जनसमुदाय हे विलोभनीय दृश्य पाहतात. तद्नंतर हिंदू-ख्रिस्ती बांधवांच्या तियात्र खेळाला आरंभ होतो. तियात्र संपल्यावर काब्रियाल घराण्यातील 'म्हारीण' तर परेरा घराण्यातील 'पावलू भुयार' हे आपली पारंपारिक कला सादर करतात. पहाटे जागर सांगतेच्या ओव्या सादर करून या लोकोत्सवाचा समारोप होतो.

**समारोप**

गोमंतकातील लोकनाट्य प्रकारांत शिवोली येथे साजरा होणाऱ्या 'जागर' या

लोकनाट्याला विशेष महत्त्व आहे. पोर्तुगाली शासन असतानाही या लोकांनी आपली लोककला जपली. धर्मांतरित झालेल्या बांधवांनी आपल्या लोकपरंपरेचा वारसा सोडला नाही. त्यामुळे शिवोलीच्या जागर लोकनाट्यात हिंदू आणि ख्रिश्चन बांधवही ही कला एकत्रपणे सादर करतात. आशी विविध सत्तांतरे व स्थित्यंतरे यांना सामोरे जात या बांधवांनी लोकश्रद्धेचा नंदादीप अखंड तेवत ठेवला, या कार्यात युवाशक्तीची साथ लाभत असल्याने या कलेचा भविष्यकालही उज्वल आहे.

**निष्कर्ष**

१. गोमंतकीय 'जागर' हा अनिष्ट निवारणार्थ सादर होणार धार्मिकविधीयुक्त लोकनाट्य कला प्रकार आहे.
२. पोर्तुगीज काळातही 'जागर' सुरू होता.
३. गोव्यातील शिवोली गावात जागराला देवत्व बहाल करण्यात आले आहे.
४. गोव्यात इतर ठिकाणी विविध मंदिरातलोकाविधी नुसार जागर साजरे होतात.
५. शिवोलीत अजून जागराचे स्वतंत्र स्थान 'मांड' असून तेथे मंदिर उभारले आहे.
६. शिवोलीतील जागरात हिंदू-खिस्ती बांधवांचे सख्य व सौख्य पहायला मिळते.
७. जागर साजरे करण्यासाठी पुरोहीत-पाद्री यांची आवश्यकता नाही.
८. जागरात अजूनही पुरुषच स्त्री-पात्र कला सादर करतात.
९. जागराचा आरंभ कोणी? कुठे? कसा केला? ओव्या कोणी रचल्या? हे प्रश्न अनुत्तरीत आहेत.
१०. विद्यमान विज्ञानयुगातील युवापिडी ही 'जागर लोकनाट्य कला परंपरा' श्रद्धेने व सन्मानाने सांभाळत आहे.

**आधार ग्रंथ सूचीः**


१. गडकरी, माधव, असा हा गोमंतक, मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई.
२. टी. बी. कुन्हा, गोमंतकीयांच्या राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.
३. मडगांवकर विनय, संतसाहित्य सिंहावलोकन, बहूजन साहित्यधारा प्रकाशन, पुणे.
४. नाईक, महादेव, पंचक्रोशीतील संतमहीमा, श्रींची इच्छा, प्रकाशन, शिवोली.
५. सरदेसाई, मनोहर, गोमंतकाचे असे ते दिवस, पुरोगामी प्रकासंन, गोवा.
६. कालभूत, पुरूशोत्तम, लोकनाट्य उद्गम व विकास, विजय प्रकाशन, नागपूर.
७. भारतीय संस्कृतीकोष, खंड ३
८. नागवेकर, पांडूरंग, जागर मंगलमूर्तीचा, शिल्पकार प्रकाशन, फोंडा गोवा.

९. खेडेकर, विनायक, लोकसरिता, कला अकादमी गोवा.
१०. जगोर, श्रीगुरू कला संगम, पिजगाळ प्रियोळ, गोवा.
११. प्रियोळकर, अ., का., गोवन इन्क्विझीशन, राजहंस प्रकाशन, पणजी, गोवा.
१२. 'भारत'कार हेगडे देसाई यांचे निवडक अग्रलेख, खंड १, संपा. शशीकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.
१३. नागवेकर, पांडूरंग, सच्चे हिंदू इथे चिरविश्रांती घेत आहेत, शिल्पकार प्रकाशन, फोंडा गोवा.
१४. देशभक्त कोश, संपा. चंद्रकांत शहासने, बहुजन साहित्यधारा प्रकाशन, पुणे.
१५. रानडे, मोहन, सतीचे वाण, सिंधू प्रकाशन, पुणे.

* * * * * *